**मीडिया रीलीज**

**डिपार्टमेंट ऑफ एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ डिसेबिलिटीज (डीईपीडब्ल्यूडी) आणि आंत्रेप्रेन्युरशीप अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (ईडीआयआय) यांच्यात कॉर्पोरेट्ससह ३००० दिव्यांग व्यक्तींना (पीडब्ल्यूडी) रोजगाराच्या आश्वासक संधी मिळवून देण्यासाठी भागिदारी**

मुंबई, ७ डिसेंबर २०२३ – आंत्रेप्रेन्युरशीप अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने (ईडीआयआय) डिपार्टमेंट ऑफ एम्पॉवरमेंट ऑफ पर्सन्स विथ डिसेबिलिटीज (डीईपीडब्ल्यूडी), सामाजिक कल्याण आणि सक्षमता मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने कॉर्पोरेट्सच्या गोलमेज परिषदेचे आयोजन केले होते. सीएसआर उपक्रमांअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना (डीईपीडब्ल्यूडी) खात्रीशीर रोजगार मिळवण्यासाठी मदत करण्याच्या दृष्टीने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

डॉ. विनीत राणा, जनरल मॅनेजर, नॅशनल हँडीकॅप्ड फायनान्स डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, डीईपीडब्ल्यूडी, भारत सरकार, श्री. जगन्नाथ साहू, अध्यक्ष, एसबीआय फाउंडेशन, श्री. राजेंद्र निंबाळकर, आयएएस, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि., मुंबई, श्री सौम्या चौधरी सीजीएम, आयडीबीआय बँक लिमिटेड, डॉ. सुनील शुक्ला, संचालक, ईडीआयआय, डॉ. रामन गुजराल, संचालक, डिपार्टमेंट ऑफ प्रोजेक्ट्स (कॉर्पोरेट) ईडीआयआय तसेच डीईपीडब्ल्यूडीचे वरिष्ठ अधिकारी, वेगवेगळ्या कॉर्पोरेट कंपन्यांचे सीएसआर लीडर्स या क्रांतीकारी परिषदेसाठी उपस्थित होते. या परिषदेत समाजाला मोठ्या प्रमाणावर संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी, दिव्यांग व्यक्तींसाठी तंत्रज्ञानावर आधारित १५०० उद्योग आणि १५०० इतर उद्योग अशा ३००० नव्या उद्योगांची स्थापना करण्याविषयी कोणती पावले उचलावी लागतील यावर चर्चा करण्यात आली. या महत्त्वाकांक्षी परिषदेत सरकार, कॉर्पोरेट्स व संस्थांच्या मदतीने दिव्यांग व्यक्तींसाठी अधिक चांगले विश्व तयार करण्याविषयी विचार मांडले गेले. शाश्वत उद्योगांची निर्मिती करून आणि पायाभूत सुविधा, दृष्टीकोन, पर्यावरण, सुरक्षा व इतर सुविधांच्या माध्यमातून त्यांचा समाजाचत पूर्णपणे समावेश करण्यासाठी सर्वोत्तम पद्धती तयार करून दिव्यांग व्यक्तींना सक्षण करण्याच्या उद्दिष्टावर या चर्चेत प्रामुख्याने भर देण्यात आला. त्याशिवाय या चर्चेमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी कामाच्या ठिकाणी सर्वसमावेशक वातावरण तयार करणे, वेगवेगळ्या व्यावसायिक कल्पनांची निर्मिती करून त्याद्वारे दिव्यांग व्यक्तींना आपला व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत करणे, प्रकल्पांची शाश्वत विकास उद्दिष्टांशी सांगड घालणे आणि महत्त्वाचे म्हणजे, दिव्यांग व्यक्तींना कमी पैशांचे रोजगार देण्याच्या सामाजिक आणि व्यावसायिक मानसिकतेमध्ये बदल करणे अशा विचारांवरही यावेळेस भरीव चर्चा झाली.

सहभागी कॉर्पोरेट्सनी ही चर्चा आणि निष्कर्षांवर आधारित सहकार्याचे पहिले काही मुद्दे निश्चित केले. दिव्यांग व्यक्तींसाठी ३००० उद्योगांची निर्मिती करण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे काही उपक्रम ठरवण्यात आले – समाजाच्या मुख्य प्रवाहात दिव्यांग व्यक्तींना समाविष्ट करण्यासाठी जागरूकता अभियान, किशोरवयीन दिव्यांग व्यक्तींसाठी आवश्यक जीवन कौशल्यांचे प्रशिक्षण, दिव्यांग व्यक्तींसाठी व्यावसायिक संधींचे स्रोत तयार करणे, दिव्यांग व्यक्तींमध्ये भावनिक जागरूकता तयार करण्यासाठी कार्यशाळा (सेन्सिटायझेशन वर्कशॉप्स), कर्जासाठी पाठिंबा, दिव्यांग व्यक्तींच्या व्यवसायाला पाठिंबा देणारा औद्योगिक विकास व कौन्सेलिंग उपक्रम आणि बेरोजगार दिव्यांग व्यक्तींना त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी मायक्रो स्किलप्रेन्युअरशीप डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (एमएसडीपी) इत्यादी.

दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी एनएचएफडीसी महत्त्वाची भूमिका बजावत असल्यावर डॉ. विनीत राणा यांनी जोर दिला. ते म्हणाले, 'एनएचएफडीसीच्या माध्यमातून आणि ईडीआयआय व कॉर्पोरेट भागिदारांच्या सहकार्याने आम्ही दिव्यांग व्यक्तींसाठी आर्थिक विकास व अर्थार्जनाच्या शाश्वत संधी पुरवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.'

श्री. जगन्नाथ साहू यांनी एसबीआय फाउंडेशन आणि ईडीआय एकत्रितपणे करत असलेल्या प्रयत्नांकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, 'एसबीआयस फाउंडेशन ईडीआयआयच्या सहकार्याने वेगवेगळया प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींसाठी रोजगाराच्या आश्वासक संधी तयार करण्यासाठी बांधील आहे. त्याचसाठी 'सपोर्ट, ॲक्टिव्हेट अँड बिल्ड अश्युअर्ड लाइव्हलीहुड्स प्रोग्रॅम तयार करण्यात आला आहे.' श्री. साहू यांनी दिव्यांग व्यक्तींसाठी इक्विटी आणि नव्या शक्यतांचे महत्त्व यांवर भर दिला.

श्री. सौम्या चौधरी यांनी आयडीबीआय बँकेच्या सीएसआर विंगची भूमिका मांडली. ते म्हणाले, 'आयडीबीआय बँक आपल्या सीएसआर उपक्रमांचा एक भाग म्हणून सातत्याने भावनिक जागरूकता तयार करण्यासाठी कार्यशाळा (सेन्सिटायझेशन वर्कशॉप्स) आयोजित करते तसेच कर्ज मिळवून देण्यासाठी आवश्यक मदत पुरवते. समाजातील वेगवेगळया स्तरांतील लोकांना आपला विकास करण्यासाठी संधी मिळवून देणारे सर्वसमावेशक वातावरण तयार करण्याचे आमचे ध्येय आहे.'

दिव्यांगाचा कौशल्य विकास आणि रोजगारासाठी नव्याने लाँच करण्यात आलेल्या डीईपीडब्ल्यूडी पीएम दक्ष पोर्टलची वैशिष्ट्ये सांगणारा एक व्हिडिओही यावेळेस दाखवण्यात आला.

डॉ. सुनील शुक्ला म्हणाले, 'विकास प्रक्रियेतून चांगले निष्कर्ष मिळवण्यासाठी आपले धोरण सर्वसमावेशक असणे गरजेचे आहे. सर्वसमावेशक धोरण इक्विटी आणि सामाजिक विकासावर भर देते, जे कोणत्याही समाजासाठी महत्त्वाचे आहे. त्याचसाठी दिव्यांग व्यक्तींसाठी विकासाच्या संधी तयार करण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. दिव्यांग व्यक्तींना योग्य प्रशिक्षण देणे आणि त्यांच्या विकासासाठी हातभार लावणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे कामाच्या ठिकाणी आणि सामाजिक चौकटीच्या विविध पातळींवर सर्वोत्तम पद्धतींचा वापर करून समानता तसेच सर्वसमावेशकता आणण्यासाठी प्रयत्न करायला हवे.'

डॉ. रमन गुजराल यांनी दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी कॉर्पोरेट्सद्वारे हाती घेतल्या जात असलेल्या विविध प्रकल्पांवर चर्चा केली. ईडीआयआयने आतापर्यंत ८६५३ दिव्यांग व्यक्तींना २७२ कौशल्य उपक्रमांद्वारे प्रशिक्षण दिले आहे व त्यातून १२४७ उद्योगांची उभारणी केली आहे. ईडीआयआयच्या परिसरात सेंटर फॉर एम्पॉवरमेंट ऑफ द डिफरंटली एबल्ड (सीईडीए) असून त्याला सामाजिक न्याय आणि सक्षमता, सामाजिक संरक्षण संचलनालय, गुजरात राज्य अपंग (दिव्यांग) वित्त आणि विकास महामंडळ, गुजरात सरकार यांचा समावेश आहे.

अधिकारी आणि कॉर्पोरेट लीडर्समध्ये चर्चा झाली. तासभर चाललेल्या या चर्चेत सहज प्रवेश, दिव्यांग व्यक्तींसाठी सहकार्यात्मक उपकरणे, एआय, रोजगाराच्या, औद्योगिक संधी शोधणे व अपंगत्वाविषयी जागरूकता निर्माण करणे अशा मुद्द्यांचा समावेश होता.

आभार प्रदर्शन आणि समूह फोटोसह या बैठकीची सांगता झाली.

**About Entrepreneurship Development Institute of India (EDII)**

The Entrepreneurship Development Institute of India (EDII), Ahmedabad was set up in 1983 as an autonomous and not-for-profit Institute with support of apex financial institutions - the IDBI Bank Ltd., IFCI Ltd., ICICI Bank Ltd. and State Bank of India (SBI). The Government of Gujarat pledged twenty-three acres of land on which stands the majestic and sprawling EDII Campus. EDII has been recognized as the CENTRE OF EXCELLENCE by the Ministry of Skill Development and Entrepreneurship, Govt. of India. The Institute has also been listed as the Institute of National Importance by the Education Department, Govt. of Gujarat. EDII operates across the country through its seven regional offices and PAN India project offices. It has international affiliates in Cambodia, Laos, Myanmar Vietnam, Uzbekistan and Rwanda. For more information visit: www.ediindia.org

**About Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan), Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India**

Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan), under Ministry of Social Justice & Empowerment, GoI was set up in May 2012 with the aims to facilitate empowerment and inclusion of the persons with disabilities and acts as a nodal agency to look after all development agenda of Persons with Disabilities (Divyangjan).Empowerment of persons with disabilities is an inter-disciplinary process, covering various aspects namely, prevention, early detection, intervention, education, health, vocational training, rehabilitation and social integration. The vision of the Department is to build an inclusive society in which equal opportunities are provided for the growth and development of Persons with Disabilities so that they can lead productive, safe and dignified lives.